दिनांक ९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमामध्ये देण्यात येणाऱ्या पुरस्कारासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन पुरस्कारासाठी पात्र अर्जाची शिफारस करण्यासाठी समिती गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः आविवि-२०१९/प्र.क्र.१०६/का.०५
आदिवासी विकास विभाग, हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ३० जुलै, २०१९.

वाचा :-

१) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. आविवि २०१७/प्र.क्र. १०५/का.०५, दिनांक ०१.०८.२०१७.

प्रस्तावना:-

वाचा येथील शासन निर्णयान्वये राज्यामध्ये ९ ऑगस्ट हा दिन "जागतिक आदिवासी दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. सन २०१९ मधील जागतिक आदिवासी दिनाचे आयोजन नागपूर येथे करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमामध्ये आदिवासी गुणवंत विद्यार्थी, खेळाडू, कलाकार, स्पर्धात्मक परिक्षामधील उत्कुष्ट कार्य केलेले विद्यार्थी इत्यादीनां गौरविण्यात येणार आहे. या पुरस्कारांसाठी राज्यातील २९ प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामधून ऑनलाईन प्रणालीव्दारा दि.३०.०७.२०१९ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार प्रत्येक क्षेत्रासाठी अर्ज प्राप्त झालेले आहेत. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननीकरुन पुरस्कारांसाठी पात्र अर्जदारांची निवड करण्यासाठी विभागस्तरावर समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

दिनांक ९ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमामध्ये देण्यात येणाऱ्या पुरस्कारासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननीकरुन पुरस्कारांसाठी पात्र अर्जदारांची अंतिम निवड करण्यासाठी विभागस्तरावर खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. सुनिल पाटील | सहसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| २ | श्री. सु.ना. शिंदे | उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ३ | श्री. ल.गो. ढोके | उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. |
| ४ | श्री. द.कृ. पानमंद | उपआयुक्त, आदिवासी विकास, नाशिक |
| ५ | श्री. हंसध्वज सोनवणे | उपसंचालक (एक्षेविका), आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे |

२. सदर समितीचा कार्यकाळ हा सन २०१९ च्या जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमापुरता राहील. सदर समितीने प्राप्त झालेल्या अर्जाची अंतिम छाननी करुन पुरस्कारासाठी पात्र अर्जाची निवड करुन त्याबाबतचा अहवाल बंद लिफाफ्यात शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०७३११२३३४१५७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Vithalrao Kove

Digitally signed by Satish Vithalrao Kove
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e13b027a7b550970150cf7dc69d276db3b1a6ebe3f71610fb5e8ff55b1676c8a, serialNumber=ce18732734ba0742d7712775e8f0ad400558e8748375399762fd447c3e9ac1eb, cn=Satish Vithalrao Kove
Date: 2019.07.31 12:43:15 +05'30'

**(सतीश कोवे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स.मंत्रालय,मुंबई
३. मा. मंत्री,आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव.मंत्रालय,मुंबई.
४. मा. राज्यमंत्री,आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद
६. मा. विधानसभा / विधान परिषद, सदस्य सर्व
७. मुख्य सचिव,यांचे उप सचिव,मंत्रालय,मुंबई
८. अ.मु.स./प्र.स./सचिव,विभाग सर्व ,मंत्रालय मुंबई.
९. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
११. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
१२. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक
१४. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक.
१५. सर्व जिल्हाधिकारी,
१६. मुख्य अभियंता, बांधकाम व्यवस्थापक कक्ष, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई.
१७. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर.
१८. सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ.
१९. सर्व सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालय.
२०. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
२१. सर्व नियंत्रक अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. निवडनस्ती कार्यासन ०५.